भतवाल हॉस्पिटल
म्हणजेच
गंगाराम हॉस्पिटल
अग्रवाल नगर,मालेगाव रोड, धुळे
मो.नं. 9158587711

# आपला महाराष्ट्र

मूल्य २.००


संस्थापक - लोकमित्र भाई मदाने

WWW.APLAMAHARASHTRA.IN

संयुक्त वर्ष ६९ ■ अंक क्र.३१९ ■ शनिवार २२ ऑगस्ट २०२६ ■ धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक आवृत्ती ■ पाने ४

Post Regd.No./DHL/53/24-26

।। श्री गणेशाय नमः ।।
कुणाल वधवा
9765595037
9405171771
श्रीराम बोरवेल्स
जमीन, घर, शेती यावर
४.७५, ५ व ६ इंची बोर करुन मिळेल.
तसेच सबमर्सिबल पंप बसवून मिळेल.
१४, राधाकृष्णन शॉपींग सेंटर, झाशी राणी चौक, मनपाजवळ, धुळे



# आपला महाराष्ट्र

शनिवार २२ ऑगस्ट २०२६ पान नं.३

## नरडाणा येथे तडीपार सापडला; एलसीबीतर्फे गुन्हा दाखल

धुळे, दि.२१- धुळे, जळगाव, नंदुरबार येथून हद्दपारचे आदेश असतानाही एक संशयित नरडाणा येथे आढळला. स्थानिक गुन्हे शाखा, धुळे यांनी कारवाई करीत नरडाणा पोलीस ठाण्यात त्याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला.नाशिक परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक संजय येनपुरे, पोलीस अधीक्षक विशाल आनंद यांनी हद्दपार (तडीपार) केलेल्या गुन्हेगारांना विना परवानगी प्रतिबंधित क्षेत्रात आल्यास त्यांचेवर महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १४२ नुसार कायदेशिर कारवाईचे निर्देश दिले आहेत.स्थानिक गुन्हे शाखा, धुळेचे पथक नियुक्त करण्यात आले. पथकाने आज नरडाणा परिसरात पाहणी केली. रेकॉर्डवरील हद्दपार स्वप्निल बबन घोलप (वय २१, रा.नरडाणा ता. शिंदखेडा) हा पुर्व परवानगी शिवाय प्रतिबंधित क्षेत्रात वावरतांना मिळाला. त्याच्याविरुद्ध नरडाणा पोलीस ठाणे येथे महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १४२ प्रमाणे गुन्हा दाखल झाला.हद्दपार स्वप्निल घोलप यास उपविभागीय दंडाधिकारी, शिरपूर यांनी २९ जुन २०२६ पासून एक वर्ष कालावधीसाठी धुळे, नंदुरबार व जळगाव जिल्हयातुन हद्दपार केले आहे.

## जयपूर येथे सीजेपीच्या आंदोलकांना मारहाण देशविरोधी घोषणा दिल्याचा ग्रामस्थांचा दावा

**जयपूर, दि.२१- राजस्थानमधील जयपूर येथे सरकारी शाळेच्या दिशेने जाणाऱ्या कॉकरोच जनता पार्टीच्या टीमवर हल्ला झाल्याची घटना घडली आहे. या टीममध्ये सीजेपीचे सह-संयोजक आणि प्रवक्ते आशुतोष रांका यांचाही समावेश होता. या हल्ल्याचा आरोप गावकऱ्यांवर करण्यात आला आहे. त्याचबरोबर सीजेपीचे संस्थापक अभिजीत दिपकेंनी देखील सोशल मिडीयावरती पोस्ट लिहून म्हटले की, राजस्थानमध्ये भाजपच्या गुंडांनी आशूवर (आशुतोष रांका) हल्ला केला आहे. आशू आणि सीजेपीच्या इतर सदस्यांना मारहाण करण्यात आली असून ते जखमी झाले आहेत. राजस्थान पोलिसांनी हे घडू दिले आहे. सीजेपीच्या दाव्यानुसार हे सामान्य नागरिक नसून भाजपचे कार्यकर्ते होते.**



**सीजेपीकडून असभ्य वर्तन - गावकरी**

या संपूर्ण प्रकरणावर गावकऱ्यांनी सीजेपीचा हा दावा फेटाळून लावला आहे. हल्ला गावकऱ्यांनी केला नसून सीजेपीच्या कार्यकर्त्यांनी स्वतःच आपल्या गाड्यांच्या काचा फोडल्या आणि देशविरोधी घोषणा दिल्या, असा आरोप गावकऱ्यांनी केला आहे. गावकऱ्यांच्या म्हणण्यानुसार, सीजेपीचे लोक येथे आले होते, तेव्हा आम्ही त्यांना प्रेमाने समजवून परत पाठवले होते. त्यानंतर गावकरीही तिथून निघून गेले. परंतु, काही वेळातच ५० ते ६० लोक पुन्हा आले. त्यांच्यासोबत महिलाही होत्या आणि त्यांच्या गाड्यांमध्ये शस्त्रास्त्रे होती. आम्ही त्यांना पुन्हा रोखण्याचा प्रयत्न केला असता त्या महिला असभ्यपणे वागू लागल्या. जेव्हा गावकऱ्यांशी गैरवर्तन केले जाते, तेव्हा गावकरीही त्याला उत्तर देतात. जो कोणी देशविरोधी घोषणा देईल, त्याला आम्ही सोडणार नाही. गावकरी लालचंद शर्मा यांनी सांगितले की, गावकऱ्यांना अडकवण्यासाठी सीजेपीच्या लोकांनी स्वतःच काठ्या चालवल्या. आम्ही त्यांचा दिल्लीतील निषेध मोर्चाही पाहिला आहे. तिथेही हे लोक देशविरोधी घोषणा देत होते. तीच गोष्ट आम्हाला अजूनही खटकत आहे. आम्ही त्यांना गावात अजिबात येऊ देणार नाही, असे शर्मा यांनी म्हटलं आहे.

**शाळा सुधारण्यास नाही राजकारणासाठी**

सीजेपीचे लोक शाळा सुधारण्यासाठी आले असताना गावकऱ्यांनी त्यांना विरोध का केला? असा **(पान ४ वर)**

### दिल्ली पेलेट गन हल्ला प्रकरण

## राहुल गांधींच्या आंदोलनाने गुन्हा दाखल प्रक्रिया सुरु

नवी दिल्ली, दि. २१ : जंतर-मंतर येथे विद्यार्थी आंदोलकांवर झालेल्या पेलेट गनच्या गोळीबाराच्या प्रकरणात काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी केलेल्या आंदोलनाला अखेर यश आले आहे. पार्लमेंट स्ट्रीट पोलीस ठाण्याबाहेर सुमारे पाच तास सुरू असलेल्या धरणे आंदोलनानंतर दिल्ली पोलिसांनी या प्रकरणात एफआयआर दाखल करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. संसदेकडे काढण्यात आलेल्या विद्यार्थी मोर्चा दरम्यान २० जुलै २०२६ रोजी रॅपिड अॅक्शन फोर्सकडून पेलेट गनचा वापर करण्यात आल्याचा आरोप आहे. या घटनेत साहिल लोचव यांच्यासह काही विद्यार्थी जखमी झाले होते. जखमी विद्यार्थ्यांच्या शरीरात २०० हून अधिक छर्रे, तर **(पान ४ वर)**

## देशभरात साखरेने ऐंशीचा टप्पा ओलांडला इथेनॉलमुळे दरवाढ : मा.साखर आयुक्त

**पुणे, दि.२१- देशात साखरेच्या किरकोळ दराने ऐंशी रुपयांचा टप्पा ओलांडल्याने सर्वसामान्यांच्या घरगुती बजेटवर मोठा परिणाम झाला आहे. साखरेच्या दरवाढीमागे उत्पादनातील घट, इथेनॉल धोरण, साखर कारखान्यांची आर्थिक स्थिती आणि बाजारपेठेतील असंतुलन यांसारखी अनेक कारणे असल्याचे माजी साखर आयुक्त शेखर गायकवाड यांनी स्पष्ट केले आहे. गेल्या दोन वर्षांत उसाचे क्षेत्र आणि उत्पादन घटल्याने देशातील साखरेच्या उपलब्धतेवर परिणाम झाला आहे. देशाची वार्षिक साखरेची गरज सुमारे २८५ लाख टन असताना उत्पादनात झालेली घट बाजारपेठेतील पुरवठ्यावर दबाव निर्माण करणारी ठरली आहे. दरम्यान, साखर दरवाढीनंतर आता शेतकरी नेते राजू शेट्टी यांनी काही प्रश्न उपस्थित करत सरकारकडे मोठी मागणी केली आहे. साखरेची अचानक झालेली दरवाढ संशयास्पद आहे. साखरेचे दर वाढले तर माझ्यासारख्या नेत्याला आनंद झाला असता. मात्र हे पैसे शेतकऱ्यांना नाहीतर व्यापाऱ्यांच्या घशात जाणार आहेत. दिवाळीपर्यंत पुरेल इतका साखरेचा साठा यंदाच्या हंगामातील आहे आणि पुढील उत्पादन देखील देशाला पुरेल इतकं असताना अचानक दर कसे काय वाढले असा प्रश्नही त्यांनी केला आहे.**

**इथेनॉल धोरणाचा साखरेवर परिणाम**

इंधनाची आयात कमी करण्यासाठी केंद्र सरकारने इथेनॉल मिश्रणाला मोठ्या प्रमाणावर प्रोत्साहन दिले. त्यामुळे साखर कारखान्यांकडून ऊसाचा काही भाग साखर उत्पादनाऐवजी इथेनॉल निर्मितीसाठी वापरला गेला. गायकवाड यांच्या मते, मागील वर्षी सुमारे पन्नास लाख टन आणि चालू वर्षी सुमारे पस्तीस लाख टन ऊस इथेनॉल निर्मितीसाठी वळवण्यात आला. इथेनॉल विक्रीतून कारखान्यांना तुलनेने जलद (२१ दिवसात) पैसे मिळत असल्याने कारखान्यांचा कलही या क्षेत्राकडे वाढला. मात्र, त्याचा परिणाम साखरेच्या उत्पादनावर आणि **(पान ४ वर)**

## शिरपुरात जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालयाचे न्यायमुर्ती श्री प्रसन्ना वराळेंच्या हस्ते उद्घाटन

**शिरपूर दि.२१ (का.प्र.)- येथील जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय आणि वरिष्ठ स्तर दिवाणी न्यायालयाचे २२ ऑगस्टला सकाळी अकराला नवी दिल्ली येथील सर्वोच्च न्यायालयाचे न्या.प्रसन्ना बी.वराळे यांच्याहस्ते उद्घाटन करण्यात येणार आहे.**

न्या.वराळे व अन्य न्यायाधीश नवीन बैठक सभागृह, ग्रंथालय कक्ष व वकील संघाच्या कक्षाचे उद्घाटन करतील. न्यायालयाच्या नूतन नामफलकाचे अनावरणही करण्यात येणार आहे. त्यानंतर येथील आर.सी.पटेल शैक्षणिक संकुलाच्या राजगोपाल भंडारी हॉलमध्ये कार्यक्रम होणार आहे. या सोहळ्यासाठी मुंबई येथील उच्च न्यायालयाचे प्रभारी मुख्य न्या. रवींद्र घुगे, न्या.सारंग कोतवाल, न्या.नितीन सूर्यवंशी, न्या.किशोर संत, न्या.संजय देशमुख, न्या.अभय वाघवसे, न्या.सिद्धेश्वर ठोंबरे, न्या. संतोष चपळगावकर, न्या.शैलेश ब्रह्मे, जिल्ह्याचे पालक न्या.अजित कडेठाणकर, न्या.वैशाली पाटील-जाधव, न्या.आबासाहेब शिंदे, कार्यक्रमाच्या अध्यक्षा तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्या.समृद्धी भिष्म, बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र अँड गोवाचे सदस्य अॅड.ज्ञानेश्वर बागूल, औरंगाबाद खंडपीठाचे शासकीय अभियोक्ता अॅड.अमरजीत गिरासे उपस्थित राहणार आहेत. शिरपूर वकील संघाचे अध्यक्ष अॅड.शांताराम महाजन, उपाध्यक्ष अॅड.विजय पाटील, सचिव अॅड. निलेश चव्हाण, कोशाध्यक्ष अॅड. प्रवीणसिंह पाटील व सदस्यांनी संयोजन केले आहे.

न्या.वैराळे यांचे शिरपूरशी नाते : सर्वोच्च न्यायालयाचे न्या. प्रसन्ना वराळे शिरपूर वरवाडे नगर परिषद संचलित पांडू बापू माळी म्युनिसीपल हायस्कूलचे माजी विद्यार्थी आहेत. त्यांचे वडील (कै.) भालचंद्र वराळे १९७१-१९७२ या वर्षी शिरपूर न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून कार्यरत होते. त्या काळात प्रसन्ना वराळे यांनी तीन वर्ष या शाळेत शिक्षण घेतले आहे. तेथे दुपारी त्यांचा दौरा होणार असून ते विद्यार्थ्यांशी संवाद साधणार आहेत. आमदार अमरीशभाई पटेल उपस्थित राहणार आहेत.

## देवपूर नेहरू चौकात भाडे थकले; दुकाने सील

धुळे, दि.२१- धुळे महानगरपालिकेच्या मालकीच्या नेहरू चौक येथील दुकानांचे थकीत भाडे वसुलीसाठी महानगरपालिकेने कारवाईची मोहीम सुरू केली आहे. त्याअंतर्गत आज थकीत भाडे असलेली दोन दुकाने सील करण्यात आली.नेहरू चौक, येथील दुकान क्रमांक २० चे धारक विवेक मधुसूदन बिरारी यांच्याकडे सन २०२२ ते २०२४ या कालावधीतील २ लाख २२ हजार ५८१ रुपये थकीत भाडे तसेच ७ हजार ८३० रुपये अनामत रक्कम, अशी एकूण २ लाख ३० हजार ८११ रुपये थकीत रक्कम होती. त्यामुळे सदर दुकान आज, दि. २० ऑगस्ट रोजी सील करण्यात आले. तसेच नेहरू चौक, सहा नंबर १७ येथील दुकान क्रमांक १३ चे धारक अली शेर अद्रीस शेख **(पान ४ वर)**

## प्रलंबित मागण्यांसाठी महाराष्ट्र राज्य लघुवेतन कर्मचाऱ्यांचे निवेदन




**धुळे, दि.२१- महाराष्ट्र राज्य लघुवेतन सरकारी कर्मचारी संघातर्फे वैद्यकीय शिक्षण व संशोधन विभाग तथा नगर विकास परिवहन सामाजिक न्याय विभाग मंत्री ना.माधुरी मिसाळ यांची मुंबई मंत्रालय येथे जावून भेट घेवून प्रलंबित मागण्यांसंदर्भातील निवेदन संघटनेचे प्रदेशाध्यक्ष गिरीश चौधरी व पदाधिकाऱ्यांनी निवेदन दिले.**

कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्यांमध्ये प्रमुख मागणे/राज्य शासकीय कर्मचारी यांना १४ एप्रिल १९८१ शासन निर्णयनुसार सेवा निवृत्त किंवा वैद्यकीय दृष्ट्या शासकीय सेवा देण्यास अपात्र ठरलेल्या किंवा स्वेच्छा निवृत्ती घेतलेल्या अशा वर्ग ३ व वर्ग ४ श्रेणी कर्मचाऱ्यांच्या एका पाल्यास विनाअट शासकीय सेवेत सामावून घेण्यात यावे. दि.१ नोव्हेंबर २००५ पासून राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना अंशदायी पेन्शन योजना लागू केली होती सदरील दि.१ नोव्हेंबर २००५ रोजी किंवा त्यानंतर शासन सेवेत रुजू झालेल्या कर्मचाऱ्यांना सन १९८२ च्या जुनी पेन्शन योजना चा लाभ देण्यात यावा.राज्य शासनाच्या सर्व विभागातील मंजूर असलेली वर्ग ३ व वर्ग ४ ची रिक्त पदे सरळ सेवेने त्वरित भरण्यात यावे. सध्या स्थितीत देण्यात येत असलेल्या अर्जित रजा ३०० दिवस रजा रोखीकरण देण्यात येते त्या ऐवजी ६०० दिवसाचे रजा रोखीकरण देण्यात यावे. केंद्राप्रमाणे राज्य शासकीय कर्मचारी यांना **(पान ४ वर)**

## धुळे तालुक्यातील दोन सराईत हद्दपार

धुळे, दि.२१- धुळे तालुक्यातील दोन सराईत गुन्हेगारांना एक वर्षासाठी हद्दपार करण्यात आले आहे. सण उत्सवाच्या पार्श्वभूमीवर पोलीस अधीक्षक विशाल आनंद यांनी आदेश काढले.धुळे जिल्हयातील सराईत गुन्हेगारांचे गुन्हे अभिलेख तपासुन त्यांच्याविरुध्द हद्दपार प्रस्ताव सादर करणेबाबत सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी, धुळे जिल्हा यांना निर्देश दिले आहेत. अपर पोलीस अधीक्षक अजय देवरे यांचेमार्फत वेळोवेळी आढावा घेण्यात येत आहे. त्यानुसार धुळे तालुका पोलीसांनी मंजुरीस्तव हद्दपार प्रस्ताव सादर केले होते. दाखल अभिलेख, सराईत गुन्हेगारांविरुध्द गुन्हे, साक्षीदार यांना सुनावणी दरम्यान तपासल्यानंतर उपविभागीय दंडाधिकारी, **(पान ४ वर)**

### धुळे सत्र न्यायालयाचा निकाल

## सुनेला पेटवून ठार मारल्याबद्दल नावराच्या चौघांना मरेपर्यंत जन्मठेप

**धुळे, दि.२१- नावरा (ता. धुळे) येथील विवाहितेला हुंड्यासाठी रॉकेल ओतून पेटवून ठार केले, याबद्दल पती सासू नणंद नंदोई या चौघांना मरेपर्यंत जन्मठेपेची शिक्षा सुनावली. धुळे जिल्हा व सत्र न्यायाधीश एस. जे. गायकवाड यांनी निकाल दिला.सरकार पक्षातर्फे अॅड. सानप यांनी काम पाहिले, त्यांना जिल्हा सरकारी वकील अॅड. देवेंद्रसिंह योगेंद्रसिंह तवर यांचे मार्गदर्शन लाभले.**

घटनेची माहिती अशी की, नावरा (ता. धुळे) येथील मृत रुपाली सागर सुर्यवंशी ही तिचे सासरी नांदत होती. तिचा पती सागर सुभाष सुर्यवंशी, सासु सुमित्राबाई सुभाष सुर्यवंशी, दीर खगोल सुभाष सुर्यवंशी, नणंद मालती छबीलाल पाटील, नंदोई छबीलाल विश्राम पाटील यांनी संगनमत केले. रुपाली हीचे लग्नात हुंडा कमी दिला, म्हणून प्लॉट खरेदी करीता तीन लाख रुपयांची तसेच जावई सागर याच्यावरील शस्त्रक्रियेसाठी हजार रुपयांची मागणी केली. पैसे आणले नाहीत म्हणून रुपालीचा शारीरिक, मानसिक छळ केला. पाच जुलै २०१४ सायंकाळी सातच्या सुमारास रुपालीच्या सासरच्या लोकांनी जाळपोळ, घातपात करुन रुपालीचा मृत्यु घडवुन आणला. याप्रकरणी धुळे तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला होता. तत्कालीन सहाय्यक पोलीस निरीक्षक यशवंत साबळे यांनी गुन्हयाचा तपास करुन आरोपपत्र दाखल केले.

खटल्याचे कामकाज जिल्हा व सत्र न्यायाधीश एस.जे. गायकवाड यांच्या न्यायालयात सुरु झाले. अतिरिक्त सरकारी अभियोक्ता ड. अजय सानप यांनी सरकार पक्षातर्फे १४ महत्वाच्या साक्षीदारांच्या साक्षी नोंदविली. त्यात पंच साक्षीदार, घटनास्थळ पंच, साक्षीदार, डॉक्टर, कॅरियर, तपासी अंमलदार, मृताची मुलगी असे होते, डॉक्टर व मृताची मुलगी यांची **(पान ४ वर)**

## धुळे ते पुणे बससेना उत्तम प्रतिसाद ज्यादा गाड्या सोडाव्यात : माकपा



**धुळे,२१- धुळे ते पुणे दरम्यान सध्या सुरू असलेल्या दोन बसेसच्या सेवेला प्रवाशांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. मात्र वाढत्या गर्दीमुळे विद्यार्थी, रुग्ण आणि नोकरीसाठी जाणाऱ्या प्रवाशांना खाजगी ट्रॅव्हल्सचा महागडा प्रवास करावा लागत असल्याने धुळे-पुणे मार्गावर किमान ६ अतिरिक्त बसेस सुरू कराव्यात, अशी मागणी भारताचा कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी), नंदूरबार-धुळे जिल्हा कमिटीतर्फे करण्यात आली आहे.**

निवेदनात म्हटले आहे की, धुळे ते पुणे या दोन बसेसच्या सेवेमुळे नागरिकांना आर्थिक आणि सोयीस्कर फायदा होत आहे. त्याबद्दल आम्ही एसटी महामंडळाचे आभार मानतो. मात्र सध्याच्या परिस्थितीत हजारोंच्या संख्येने प्रवासी आहेत. त्यात वृद्ध, युवक, पुण्यात शिक्षण घेणारे विद्यार्थी आणि रुग्ण यांचा समावेश आहे. जागा मिळत नसल्याने त्यांना खाजगी ट्रॅव्हल्समधून महागड्या दराने प्रवास करावा लागतो आहे. प्रवाशांच्या सोयीसाळी धुळे-पुणे मार्गावर किमान ६ बसेस तरी वाढवाव्यात. त्यापैकी २ बसेस वातानुकूलित आणि १ बस स्लीपर कोच असावी. धुळे-पुणे ही अतिरिक्त सेवा तातडीने सुरू करावी. अशी मागणी कॉ. एल.आर. राव, कॉ. दीपक सोनवणे यांच्यासह पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी केली आहे

## जलतरण तलावाची फी कमी करा सर्व.सभेत हिरालाल चौधरींची मागणी



**नंदुरबार (प्रतिनिधी) नंदुरबार नगरपालिकेच्या स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे जलतरण तलावाची वाढविण्यात आलेली फी तात्काळ कमी करावी, अशी मागणी विरोधी पक्षनेते हिरालाल चौधरी यांनी सर्वसाधारण सभेत केली. याबाबत त्यांनी सभेत निवेदनही दिले. वाढीव शुल्क कमी न केल्यास तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा त्यांनी दिला.**

पूर्वी जलतरण तलावाची वार्षिक फी ५,००० रुपये होती. मात्र, ती वाढवून २०,००० रुपये करण्यात आली **(पान ४ वर)**

## तोरणमाळमध्ये अस्वच्छतेचे साम्राज्य; कचऱ्याचे ढीग; ग्रामस्थ संतप्त

**धडगाव, दि.२० (प्रतिनिधी)- स्वच्छ भारत, स्वच्छ शहरचा नारा देत शासनाकडून गाव आणि शहरांच्या स्वच्छतेवर मोठा भर दिला जात आहे. मात्र, महाराष्ट्रातील प्रसिद्ध थंड हवेचे ठिकाण असलेल्या तोरणमाळ येथे स्वच्छतेचा बोजवारा उडाल्याचे चित्र दिसत आहे. गावातील तुंबलेल्या गटारी, रस्त्यावरून वाहणारे सांडपाणी आणि ठिकठिकाणी साचलेला कचरा यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.**



तोरणमाळ गावातील अनेक भागांमध्ये गटारी गेल्या अनेक दिवसांपासून तुंबलेल्या आहेत. त्यामुळे दुर्गंधीयुक्त सांडपाणी रस्त्यावरून वाहत असून नागरिकांना त्यातूनच मार्ग काढावा लागत आहे. गटारीचे पाणी रस्त्यावरून वाहत असल्याने स्थानिक नागरिकांसह तोरणमाळला येणाऱ्या पर्यटकांनाही मोठा त्रास सहन करावा लागत आहे. दैनंदिन साफसफाईअभावी अनेक भागांत आधीच अस्वच्छता आणि दुर्गंधीचे वातावरण असताना तुंबलेल्या गटारींच्या सांडपाण्यामुळे परिस्थिती अधिकच गंभीर झाली आहे. साचलेल्या पाण्यात डासांची उत्पत्ती वाढत असून साथीचे आजार पसरण्याची शक्यता निर्माण झाली आहे. तसेच गावात घराघरातून कचरा संकलन करण्यासाठी घंटागाडी नियमित येत नसल्याने नागरिकांसमोर कचरा विल्हेवाटीचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे काही नागरिकांकडून कचरा व प्लास्टिकच्या पिशव्या उघड्यावर टाकल्या जात आहेत. हा कचरा नाल्यांमध्ये साचल्याने नाल्या तुंबण्याचे प्रमाणही वाढले आहे. रस्त्यांच्या कडेला व चौकांमध्ये मोठ्या प्रमाणात कचरा पडून राहतो. पावसामुळे हा कचरा भिजल्याने परिसरात तीव्र दुर्गंधी पसरत आहे. त्यामुळे नागरिकांच्या आरोग्याबाबत चिंता व्यक्त होत आहे.

स्वच्छतेच्या समस्येबाबत स्थानिक नागरिकांनी ग्रामपंचायतीकडे अनेकदा तक्रारी केल्या असल्याचे सांगितले जाते. मात्र, समस्या कायम असल्याने ग्रामस्थांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. गावातील मूलभूत स्वच्छता व्यवस्था, गटारीचे नियमित साफसफाई आणि कचरा संकलनाची व्यवस्था सुरळीत करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे. ेरणमाळ हे पर्यटनाच्या दृष्टीने महत्त्वाचे **(पान ४ वर)**

## देवपूरात घरफोडी दोन आरोपी जेरबंद

धुळे, दि.२१- देवपूर परिसरात दोन ठिकाणी चोरी घरफोडी करणाऱ्या पाच जणांची टोळी पोलिसांनी निष्पन्न केली. त्यातील दोन जणांना अटक केली असून चोरीचा मुद्देमाल जप्त केला. बेपत्ता तिघांचा शोध सुरू आहे. देवपूर परिसरातील मृगांक भगवानसिंग ठाकुर यांच्या लक्ष्मी कॉलनीतील घरातुन एकुण ३१ हजार ९०० रुपयांचे चांदी व पितळी मुर्ती, वस्तु व रोकड लंपास केली. याप्रकरणी देवपूर पोलीस ठाण्यात १८ ऑगस्टला घरफोडीचा गुन्हा दाखल झाला. देवपूर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक **(पान ४ वर)**

### धुळे जिल्हा वकील संघातर्फे

## सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती प्रसन्न वराळेच्या मुख्य उपस्थितीत आज धुळ्यात मान्यवरांचा सत्कार

**धुळे, दि.२१-धुळे जिल्हा वकील संघाच्या वतीने आज शनिवार दि.२२ ऑगस्ट २०२६ रोजी भव्य सत्कार सोहळा आणि विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्याला प्रमुख अतिथी म्हणून भारताच्या सर्वोच्च न्यायालयाचे माननीय न्यायमूर्ती श्री. प्रसन्न वराळे साहेब उपस्थित राहणार आहेत. तर मुंबई उच्च न्यायालयाचे प्रभारी मुख्य न्यायमूर्ती माननीय श्री. रवींद्र व्ही. घुगे साहेब हे सन्माननीय अतिथी म्हणून लाभणार आहेत.**

उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तींची विशेष उपस्थिती

या सोहळ्यास मुंबई उच्च न्यायालय तसेच विविध खंडपीठांचे सन्माननीय न्यायमूर्ती विशेष अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. यामध्ये माननीय न्यायमूर्ती श्री. मकरंद कर्णिक साहेब, माननीय न्यायमूर्ती श्री. नितीन सूर्यवंशी साहेब, माननीय न्यायमूर्ती श्री. संजय देशमुख साहेब, माननीय न्यायमूर्ती श्री. एस. जी. चपळगावकर साहेब, माननीय न्यायमूर्ती श्री. अजित काडेठाणकर साहेब, माननीय न्यायमूर्ती श्रीमती वैशाली पाटील-जाधव मॅडम, माननीय न्यायमूर्ती श्री. सारंग कोतवाल साहेब, माननीय न्यायमूर्ती श्री. किशोर संत साहेब, माननीय न्यायमूर्ती श्री. अभय वाघवासे साहेब, माननीय न्यायमूर्ती श्री. शैलेश ब्रम्हे साहेब, माननीय न्यायमूर्ती श्री. सिद्धेश्वर ठोंबरे साहेब आणि माननीय न्यायमूर्ती श्री. आबासाहेब डी. शिंदे साहेब यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.

विविध उपक्रमांची रेलचेल

संध्याकाळी ६:३० वाजता धुळे जिल्हा वकील संघाच्या बार रूममध्ये मान्यवरांचे पारंपरिक स्वागत आणि औक्षण करून कार्यक्रमाची सुरुवात होईल. याप्रसंगी बार असोसिएशनच्या दिवंगत सदस्यांच्या तैलचित्रांचे अनावरण न्या. प्रसन्न वराळे यांच्या हस्ते करण्यात येईल. यानंतर धुळे जिल्हा व सत्र न्यायालय परिसरात वृक्षारोपण सोहळा पार पडेल. मुख्य सत्कार सोहळा महिरे भवन येथे संध्याकाळी ७ वाजता मुख्य कार्यक्रम धुळे येथील हिरे भवन येथे आयोजित करण्यात आला आहे. दीपप्रज्वलन आणि प्रतिमापूजनानंतर माननीय न्यायमूर्ती श्री. प्रसन्न वराळे यांच्या जीवनप्रवासावर व न्यायिक कारकिर्दीवर आधारित लघुपट दाखवण्यात येईल.

त्यानंतर वकील संघाच्या अध्यक्षांचे स्वागतपर भाषण, प्रमुख पाहुण्यांचे मार्गदर्शन आणि धुळे जिल्ह्याचे प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, पालक न्यायाधीश आणि उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तींचे मार्गदर्शनपर भाषणे होतील.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी धुळे जिल्हा वकील संघाचे अध्यक्ष अॅड. राहुल एस. भामरे, उपाध्यक्ष अॅड. विशाल एम. साळवे, महिला उपाध्यक्ष अॅड. सुनिता शिंदे, सचिव अॅड. बळीराम वाघ, अॅड. प्रसाद एस. देशमुख, अॅड. भारती पाटील, अॅड. पवन सूर्यवंशी आणि कार्यकारिणीचे सर्व सदस्य व धुळे बार असोसिएशनचे वकील बांधव परिश्रम घेत आहेत.

या सोहळ्यास जिल्ह्यातील वकील व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन धुळे जिल्हा वकील संघातर्फे करण्यात आले आहे.

## शासकीय आश्रमशाळांमधील शिक्षकांच्या दोन ह.चारशे एकतीस पदांसाठी भरती

**नाशिक, दि.२०- आदिवासी विकास विभागांतर्गत कार्यरत शासकीय आश्रमशाळांमधील शिक्षकांची रिक्त पदे भरण्यासाठी पवित्र पोर्टलद्वारे शिक्षक भरती प्रक्रिया राबविण्यात येत आहे. राज्यातील नाशिक, ठाणे, अमरावती व नागपूर या चार विभागांतील शासकीय आश्रमशाळांमध्ये प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षकांची एकूण दोन हजार ४३१ रिक्त पदे भरण्यात येणार असल्याची माहिती आदिवासी विकास विभागाच्या उपायुक्त शशिकला अहिरराव यांनी दिली आहे.**

आदिवासी विकास विभागांतर्गत शासकीय आश्रमशाळा व अनुदानित आश्रमशाळांमधील पेसा व नॉन-पेसा क्षेत्रातील शिक्षकांच्या रिक्त पदांसाठी ही भरती प्रक्रिया राबविण्यात येत आहे. पवित्र पोर्टलद्वारे वर्ग संवर्गातील प्राथमिक शिक्षक, माध्यमिक शिक्षक व उच्च माध्यमिक शिक्षक (शिक्षण सेवक) या पदांची भरती करण्यात येणार आहे. या भरती प्रक्रियेत पेसा क्षेत्रातील ८८५ तर नॉन-पेसा क्षेत्रातील १ हजार ५३६ पदांचा समावेश आहे. प्राथमिक, माध्यमिक तसेच उच्च माध्यमिक स्तरावरील मराठी व इंग्रजी माध्यमातील शिक्षकांची पदे यामध्ये समाविष्ट आहेत. उच्च **(पान ४ वर)**

## सफाई कर्मचाऱ्यांच्या योजनांची अंमलबजावणी करा अन्यथा शिस्तभंग कारवाई; मुकेंश सारवानांचा इशारा

**धुळे,२१- महानगर पालिकेतील सफाई कर्मचाऱ्यांसाठीच्या योजनांची काटेकोर अंमलबजावणी करावी. या संदर्भातील विविध प्रकरणांचा अहवाल पंधरा दिवसांच्या आत पाठवावा. कामात दिरंगाई झाल्यास शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल. असा इशारा महाराष्ट्र राज्य सफाई कर्मचारी आयोगाचे उपाध्यक्ष मुकेश सारवान यांनी महापालिकेत घेण्यात आलेल्या पत्रकार परिषदेप्रसंगी दिला.**



भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृहात राज्य सफाई कर्मचारी आयोगाचे उपाध्यक्ष मुकेश सारवान यांनी सफाई कर्मचाऱ्यांच्या कामकाजाविषयीची आढावा बैठक घेतली. यावेळी त्यांचे स्विय सहाय्य राजीव सोनवणे, आयुक्त नितीन कापडणीस, अति.आयुक्त करूणा डहाळे, उपायुक्त मनोज वाघ यांच्यासह विविध विभागांतील अधिकारी उपस्थित होते. यावेळी सारवान यांनी पुढे बोलतांना सांगितले की, शासन निर्णयानुसार सफाई कर्मचाऱ्यांसाठी असलेल्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर श्रमसाफल्य योजनेची काटेकोर अंमलबजावणी करावी. लाड पागे प्रकरणांचा निपटारा करण्यासाठी पंधरा दिवसांच्या आत अहवाल सादर करावा. कोणत्याही सफाई कर्मचाऱ्यावर **(पान ४ वर)**

**दिपक ज्वेलर्स**

सोने- 22 K -1,44,300 रु.+3% GST

सोने- 24 K -1,57,500 रु.+3% GST

चांदी- 2,43,000 रु.+3% GST

तारगल्ली, सराफ बाजार, धुळे

फोन नं.२३३१०३/२३४१०३

पान १ वरुन

## सीजेपीच्या आंदोलकांना मारहाण

प्रश्न विचारला असता एका गावकऱ्याने स्पष्टपण सांगितले की, सीजेपीचे लोक शाळा सुधारण्यासाठी नव्हे, तर स्वतःचे पाय रोवण्यासाठी आणि राजकारण करण्यासाठी याठिकाणी येत आहेत. त्यांचा दुसरा कोणताही उद्देश नाही. येथील शाळेसाठी निधी मंजूर झाला असून लवकरच प्रत्यक्ष कामही सुरू होणार आहे. सीजेपी ही देशविरोधी पार्टी असून त्यांना परदेशातून निधी मिळतो. त्यामुळे अशा देशविरोधी पक्षाला आणि देशाशी गद्दारी करणाऱ्यांना आम्ही आमच्या गावात कधीही पाय ठेवू देणार नाही, असा दावाही गावकऱ्यांनी केला आहे.

नेमके काय घडले?

कॉकरोच जनता पक्षाच्या (सीजेपी) शाळा भेटी विरोधात जयपूरमध्ये कडाडून विरोध सुरु आहे. आज बागरू येथील रामपुरा कंवरपुरा येथील शासकीय प्राथमिक शाळेची पाहणी करण्यासाठी आलेले सीजेपीचे सह-संयोजक आणि प्रवक्ते आशुतोष रांका आणि त्यांच्या सहकाऱ्यांना गावकऱ्यांनी बेदम मारहाण केली. त्यांनी रांका आणि रांका यांच्यावर दगडफेकही केली. महिलांनी रांका यांच्या महिला समर्थकांवर चिखलफेक केली. दुसरीकडे, सीजेपीच्या काही कार्यकर्त्यांची गावकऱ्यांशी झटापट झाली होती. गावकऱ्यांनी सीजेपीच्या कार्यकर्त्यांना गावातून हाकलून दिले. सीजेपीविरोधात घोषणाबाजी करत गावकऱ्यांनी शासकीय शाळेबाहेर धरणे आंदोलन केले. त्यांनी ट्रॅक्टर ट्रॉली लावून मुख्य रस्ता अडवला. लोकांनी मुख्य रस्ता बंद केला होता आणि वाहनांची तपासणी केली जात होती.शाळेची दुरुस्ती आम्ही स्वतःच्या खर्चाने करू, असे गावकऱ्यांनी आणि भाजप कार्यकर्त्यांनी सांगितले. सरकारने १२.५० लाख रुपयांनाही मंजुरी दिली होती. आम्ही कोणत्याही बाहेरील व्यक्तीला येथे येऊ देणार नाही. कॉकरोचना येथे येऊन घाण करायची असते, जे आम्ही कोणत्याही परिस्थितीत सहन करणार नाही. रामपुरा येथील शाळा जीर्ण इमारतीमुळे बंद करण्यात आली आहे. मुलांना जवळच्याच एका आवारात शिकवले जात आहे. सीजेपी टीम जयपूरमधील दोन सरकारी शाळांना भेट देणार होती.

## दिल्ली पेलेट गन हल्ला प्रकरण

डोळ्यात तीन छर्रे घुसल्याचा दावा वैद्यकीय अहवालाच्या आधारे करण्यात आला आहे. या घटनेनंतर दोषींवर कारवाई करण्याची मागणी सातत्याने केली जात होती. राहुल गांधी यांनी शुक्रवारी जखमी विद्यार्थ्याच्या समर्थनार्थ पार्लमेंट स्ट्रीट पोलीस ठाण्याबाहेर धरणे आंदोलन सुरू केले. या प्रकरणात एफआयआर दाखल होईपर्यंत आंदोलन मागे घेणार नसल्याची भूमिका त्यांनी घेतली होती. जोपर्यंत एफआयआर नोंदवला जात नाही आणि दोषींवर कठोर कारवाईची खात्री मिळत नाही, तोपर्यंत आम्ही आमच्या भूमिकेवर ठाम राहू. आमचे ध्येय न्याय मिळवून देणे आहे, अशी भूमिका राहुल गांधी यांनी मांडली.

दरम्यान, दिल्ली पोलिसांनी राहुल गांधी यांच्या मागणीला सकारात्मक प्रतिसाद देत अज्ञात व्यक्तींविरोधात एफआयआर दाखल करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. त्यामुळे पेलेट गन हल्ल्याच्या प्रकरणाच्या तपासाला आता अधिकृत सुरुवात होण्याची शक्यता आहे. या कारवाईनंतर राहुल गांधी आणि आंदोलनकर्त्यांची पुढील भूमिका काय असेल, तसेच तपासात कोणाची जबाबदारी निश्चित होते, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

## साखरेने ऐंशीचा टप्पा ओलांडला

बाजारातील उपलब्धतेवर झाला. साखरेचा पुरवठा कमी होत असताना मागणी कायम राहिल्याने दरवाढीला हातभार लागल्याचे सांगितले जात आहे. महाराष्ट्रात इथेनॉल प्रकल्पांमध्ये ३० हजार कोटींची गुंतवणूक झाली आहे. त्यामुळे साखरेचे उत्पादन अपेक्षेपेक्षा कमी झाले आहे.

कारखान्यांच्या आर्थिक अडचणी कारणीभूत

ऊस उत्पादकांना देण्यात येणारी एफआरपी वाढत गेली. मात्र साखरेची विक्री किंमत म्हणजेच एफ्आरपी त्याच प्रमाणात आणि योग्य वेळी वाढवण्यात आली नाही, असा मुद्दाही गायकवाड यांनी उपस्थित केला आहे. त्यामुळे अनेक साखर कारखान्यांच्या आर्थिक गणितावर परिणाम झाला. त्यात बँकांच्या कर्जावरील व्याजाचा वाढता बोजा भर पडत असल्याने कारखानदारीसमोर आर्थिक आव्हाने निर्माण झाली आहेत.

दरवाढ संशयास्पद - राजू शेट्टी

सध्या साखरेच्या इतिहासात सर्वात मोठी वाढ झाली आहे. साखर ७ हजार ५०० प्रति क्विंटलवर गेली आहे. याचा ग्राहकांना मोठा आर्थिक फटका बसत आहे. साखर दरवाढीनंतर आता शेतकरी नेते राजू शेट्टी यांनी काही प्रश्न उपस्थित करत सरकारकडे मोठी मागणी केली आहे. साखरेची अचानक झालेली दरवाढ संशयास्पद आहे. साखरेचे दर वाढले तर माझ्यासारख्या नेत्याला आनंद झाला असता. मात्र हे पैसे शेतकऱ्यांना नाहीतर व्यापाऱ्यांच्या घशात जाणार आहेत. दिवाळीपर्यंत पुरेल इतका साखरेचा साठा यंदाच्या हंगामातील आहे आणि पुढील उत्पादन देखील देशाला पुरेल इतकं असताना अचानक दर कसे काय वाढले असा प्रश्नही त्यांनी केला आहे.

## देवपूर नेहरू चौकात भाडे थकले

यांच्याकडे सन २०२२ ते २०२५ या कालावधीतील २ लाख ३० हजार ८०६ रुपये थकीत भाडे व ८ हजार १०० रुपये अनामत रक्कम, अशी एकूण २ लाख ३८ हजार ९०६ रुपये थकीत रक्कम होती. त्यामुळे सदर दुकानही सील करण्यात आले. ही कारवाई महानगरपालिका आयुक्त नितीन कापडणीस यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. कारवाईत सहाय्यक आयुक्त सोनाली देवरे-पगार, बाजार विभाग प्रमुख सूर्यकांत हजारे, वरिष्ठ सहाय्यक प्रकाश कातेपुरी, लिपिक दानिश अन्सारी व शिपाई इफ्तेखार शेख यांनी सहभाग घेतला.

## लघुवेतन कर्मचाऱ्यांचे निवेदन

वाहतूक भत्ता व वैद्यकीय भत्ता देण्यात यावा. कोविड काळात व तसेच उदभवणारे साथीचे रोगात संपर्कात येणारे वैद्यकीय शिक्षण व आरोग्य सेवेतील तसेच अत्यावश्यक सेवेतील कर्मचारी यांना अति संवेदनाशील रूग्णाची सेवा करताना संपर्कात येत असल्यामुळे काही कर्मचारी मृत्यू पावले आहेत काही कर्मचारी आरोग्याच्या विविध समस्यांनी ग्रस्त आहेत करिता वर्ग ३ व वर्ग ४ कर्मचाऱ्यांना जोखीम भत्ता देण्यात यावा. आदिंचा समावेश आहे. निवेदन स्विकारल्यानंतर ना.माधुरी मिसाळ यांनी कर्मचाऱ्यांच्या मागण्या संदर्भात मुंबई येथे बैठक लावून लवकरात लवकर मागण्या सोडवण्यात येतील अशा प्रकारचे आश्वासन दिले.निवेदन देतांना संघटनेचे प्रदेशाध्यक्ष गिरीश चौधरींसह राज्य कोषाध्यक्ष चंद्रकांत भदाणे, राज्य कार्याध्यक्ष एल.एल.आडेप पुणे राज्य सहसचिव मनोहर गायकवाड, पुणे धुळे जिल्हा अध्यक्ष राहुल वाघ, सचिव नंदकिशोर अंभेरे, शहर उपाध्यक्ष राधेश्याम देसाई व इतर कर्मचारी मोठ्या संख्येत उपस्थित होते.

## दोन सराईत हद्दपार

धुळे भाग रोहन कुवर यांनी सराईत राहुल बाळु पाटील (वय २४), रोहित बाळु पाटील (वय २६, दोघे रा. चिंचखेडा ता.धुळे) यांना एक वर्षासाठी धुळे जिल्हासह जळगाव जिल्हयातील अमळनेर, पारोळा, चाळीसगाव हद्दीतुन हद्दपार केले आहे.अधीक्षक विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक अजय देवरे, उपअधीक्षक सुधीर पाटील यांचे मार्गदर्शनाखाली धुळे एलसीबीचे पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर वारे, धुळे तालुका पोलीस ठाणेचे निरीक्षक धनंजय पाटील यांनी कारवाई केली.

## नावराच्या चौघांना मरेपर्यंत जन्मठेप

न्यायालयात महत्वाची ठरली. सरकारपक्षातर्फे ॲड. सानप यांनी साक्षीदारांच्या साक्ष व त्या अनुषंगाने केलेला युक्तीवादाचा आधार घेत आरोपीला जास्तीत-जास्त शिक्षा देण्याचा युक्तीवाद केला. न्यायाधीश गायकवाड यांनी साक्षीदारांची साक्ष आणि पुरावे ग्राह्य धरून पती सागर सुर्यवंशी, सासु सुमित्राबाई सुर्यवंशी, नणंद मालती पाटील नंदोई छबुलाल पाटील यांना मरेपर्यंत जन्मठेपेची शिक्षा व सर्व आरोपींना मिळुन १ लाख ३४ हजार रुपये दंडाची शिक्षा ठोठावली.

पान १ वरुन

## योजनांची अंमलबजावणी करा

अन्याय होणार नाही याची काळजी घ्यावी. कर्मचाऱ्यांच्या शैक्षणिक अर्हतेनुसार पदोन्नती द्यावी. वेळेच्या आत काम न झाल्यास शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल. असा सज्जड दमही सारवान यांनी यावेळी मनपा प्रशासनाला भरला. तीन महिन्यांनंतर आपण पुन्हा येवून महापलिकेत येवून आढावा घेवू. असेही सुनावले.महापालिकेत सफाई कर्मचाऱ्यांचे एक हजार अठ्ठावन्न पदे मंजूर असून त्यापैकी केवळ ७६० कर्मचाऱ्यांची भरती करण्यात आलेली आहे. त्यातील १४१ कर्मचाऱ्यांची २० ते २५ वर्षे सेवाकाळ उलटला आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर श्रमसाफल्य योजनंतर्गत शासननिर्णयानुसार २००८ पासून २०२६ अर्थात १८ वर्षांचा कालावधी उलटला. आता पर्यंत किती कर्मचाऱ्यांना घरे मिळाली ? लाड पागे अंतर्गत असलेल्या प्रकरणांचे काय झाले ? अशा राजीव सोनवणेंनी उपस्थित केलेल्या प्रश्नांवर मनपा प्रशासन निरूत्तर झाले. राज्य शासनाचा २०१६ च्या अध्यादेशानुसार सफाई कर्मचाऱ्यांना सुट्या देण्याबाबत नमुद केले आहे. परंतू त्यांना सुट्या का दिल्या जात नाहीत ? याबाबतही खुलासा सफाई कामगारांच्या बैठकीप्रसंगी राज्य सफाई कर्मचारी आयोगाचे उपाध्यक्ष मुकेश सारवान यांनी मागवला आहे.

## शासकीय आश्रमशाळांमधील शिक्षकांच्या दोन ह.चारशे एकतीस पदांसाठी भरती

(पान ३ वरुन) माध्यमिक स्तरावर मराठी, इंग्रजी, इतिहास, राज्यशास्त्र, भूगोल, अर्थशास्त्र, गणित, जीवशास्त्र, रसायनशास्त्र आणि भौतिकशास्त्र या विषयांच्या शिक्षकांची पदे भरण्यात येणार आहेत.नाशिक विभागात ८२६, ठाणे विभागात ६१३, अमरावती विभागात ४६८ आणि नागपूर विभागात ५१४, अशी एकूण २ हजार ४२१ पदे उपलब्ध आहेत. आश्रमशाळा शिक्षक भरती प्रक्रियेत स्थानिक तसेच आदिवासी क्षेत्रांना न्याय मिळवून देण्यासाठी पेसा व नॉन-पेसा क्षेत्रांचे स्पष्ट विभाजन करण्यात आले आहे. पवित्र पोर्टलद्वारे पारदर्शक, गुणवत्ताधारित व नियमानुसार भरती प्रक्रिया राबविण्यात येत आहे. त्यामुळे उमेदवारांनी कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवता अधिकृत माहितीकडे लक्ष द्यावे, असे आवाहन आदिवासी विकास विभागाच्या आयुक्त लीना बनसोड यांनी केले आहे.

**पाहिजेत**
१ अकाउंटंट
२. दुकान हेल्पर
३.हमाल/लोडिंग कर्मचारी.
* अनुभवी उमेदवारांना प्राधान्य.
* आकर्षक पगार व इतर सुविधा.
-:संपर्क :-
महावीर क्लॉथ स्टोअर्स
कापड व्यापारी,
लेन नं. २ धुळे
9404565937

**भाड्याने देणे आहे**
वाडीभोकर रोडवरील स्टेडियम जवळील १५X१२चा गाळा (शॉप) भाड्याने देणे आहे.
-:संपर्क :-.
9096861610

झाडे लावा झाडे जगवा

पान १ वरुन

## तोरणमाळमध्ये अस्वच्छतेचे साम्राज्य

ठिकाण असून येथे वर्षभर पर्यटकांची मोठी वर्दळ असते. अशा पर्यटनस्थळावर मुख्य रस्त्यांवरच कचरा आणि सांडपाणी दिसत असल्याने पर्यटनस्थळाच्या प्रतिमेलाही धक्का बसण्याची शक्यता आहे. नंदुरबार जिल्हा प्रशासनाने या समस्येची तातडीने दखल घेऊन तोरणमाळमधील तुंबलेल्या गटारींची साफसफाई, कचरा संकलन आणि नियमित स्वच्छता व्यवस्था सुरू करावी. तसेच स्वच्छतेबाबत निष्काळजीपणा करणाऱ्यांवर योग्य ती कार्यवाही करावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते जिवनदादा रावताळे, करमसिंग रहेमसिंग रावताळे, रवींद्र छगन चौधरी, भरत जहांग्या चौधरी व ग्रामस्थांनी केली आहे.

## दोन आरोपी जेरबंद

प्रतापसिंग मोहिते यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस पथकानेअविनाश सुरेश पांचाळ (वय २३, रा. महिंदळे शिवार, धुळे), दीपक संजय पाटील (वय २४, रा. ह. मु. लामकानी, ता.धुळे) यांना ताब्यात घेतले. त्यांची कसून चौकशी केली असता तीन साथीदारांच्या संगनमाने देवपूर व पश्चिम देवपूर पोलीस ठाणे येथील दोन गुन्हयांची कबुली दिली.दोघा संशयितांकडून पोलिसांनी कलर टि.व्ही., देवीचा चांदीचा शिक्का, रोकड असा १२ हजार ३०० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला. पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक अजय देवरे, उपअधीक्षक राजकुमार उपासे यांचे मार्गदर्शनाखाली सहायक निरीक्षक प्रतापसिंग मोहिते, हवालदार मिलींद सोनवणे, महेंद्र विसपुते, महेंद्र भदाणे, भटेंद्र पाटील, वसंत कोकणी, राहुल गुंजाळ, सौरभ कुटे, नितिन चव्हाण, शुभम बोरसे यांनी कारवाई केली.



सहावे पुण्यस्मरण

तुमचं असणं
आमच्यासाठी सर्व होतं,
ते आमच्या जीवनातील
सुंदर पर्व होतं,
आज सर्व काही
असल्याची जाणीव आहे
पण तुमचं नसणं ही
सर्वात मोठी उणीव आहे
आपल्या पुण्यस्मरणानिमित्ताने
भावपुर्ण आदरांजली!

मातोश्री कालकथित
सुशिलाबाई श्रावण भामरे
(माजी नगरसेविका म.न.पा., धुळे)
मृत्यू दि. २२/०८/२०२०

-- शोकाकुल --

विजय श्रावण भामरे | सुनंद श्रावण भामरे | गौतम श्रावण भामरे
अरविंद पिराजी थोरात | रवींद्र बाबुराव बोरसे | प्रदीप भिंगार दिवे
ॲड.शामल विजय भामरे | मयुर गौतम भामरे | रजत रवींद्र बोरसे
सौ.लता अरविंद थोरात | सौ.त्रिशला रविंद्र बोरसे
(निशा भामरे, मनिष भामरे, यश भामरे, अनिकेत थोरात, रचना बोरसे, ईशान, ईशित भिंगार दिवे)

समस्त भामरे परिवार, धुळे

पान १ वरुन

## जलतरण तलावाची फी कमी करा

आहे. तसेच दररोजचे शुल्क ५० रुपयांवरून १०० रुपये करण्यात आले आहे. ही शुल्कवाढ अन्यायकारक असून, ती तात्काळ मागे घ्यावी, अशी मागणी चौधरी यांनी केली.नंदुरबारमधील आदिवासी मुलांना राज्यस्तरीय जलतरण स्पर्धांमध्ये सहभागी होता यावे, या उद्देशाने जलतरण तलावाची निर्मिती करण्यात आली आहे. मात्र, अवाजवी शुल्कवाढीमुळे या मूळ उद्देशालाच हरताळ फासला जात असल्याचा आरोप त्यांनी केला. नाशिक महानगरपालिकेच्या जलतरण तलावाची वार्षिक फी ६,८१५ रुपये असताना नंदुरबारमध्ये २०,००० रुपये शुल्क आकारणे अन्यायकारक असल्याचे त्यांनी सांगितले.याशिवाय पालकांना जलतरण तलावात जाण्यासाठी बागेतून प्रवेश घ्यावा लागतो आणि त्यासाठी स्वतंत्र १० रुपये शुल्क आकारले जाते. यामुळे पालक आणि ठेकेदार यांच्यात दररोज वाद होत असल्याचेही चौधरी यांनी सभेत निदर्शनास आणून दिले. ठेकेदाराने शुल्कवाढ करताना प्रशासनाची परवानगी घेतली होती का? हा विषय कोणत्या सभेत मांडण्यात आला होता? तसेच नगरपालिकेच्या ठराव क्रमांक ७ ची माहिती आम्हाला देण्यात आली नाही, त्यामुळे या ठरावाला आमचा विरोध कायम आहे, असेही हिरालाल चौधरी यांनी सांगितले.जलतरण तलावाचा विषय पुढील सर्वसाधारण सभेत आयत्या वेळेस घेण्यात येईल, असे आश्वासन नगराध्यक्षा रत्ना रघुवंशी यांनी दिल्याचे चौधरी यांनी सांगितले.यावेळी गटनेते आनंद माळी,नगरसेवक पंकज चौधरी,रेखा चौधरी,शोभा चौधरी,सारिका माळी नीता मराठे, सुष्मा गावीत,लक्ष्मण माळी, प्रकाश भोई, आकाश चौधरी, संतोष वसईकर, विक्की मराठे, दीपक चौधरी आदी उपस्थित होते.

**धुळे महानगरपालिका**
**आयुक्त कार्यालय**

**जाहीर सूचना**

या जाहीर सूचनेद्वारे सूचित करण्यात येते की, श्री.कुणाल पाटील रा. देवपूर धुळे यांनी महानगरपालिका हद्दीतील मौजे देवपूर स.क्र.२८/अ या मंजूर अभिन्यासातील भू.क्र.२४, २५ व २७ (सि.सं.क्र.८९७६, ८९८३ व ८९८१) ह्या त्यांच्या मालकीच्या जागेतून भू.क्र.२४ व २५ (सि.सं.क्र.८९७६, ८९८३) मध्ये दर्शविलेल्या ६.०० मी रुंदीच्या रस्त्यामुळे संबंधित जागेचा नियोजनबद्ध विकास करण्यात अडचणी निर्माण असल्याने सदर दोन्ही सि.सं.क्र.८९७६, ८९८३ चा एकत्रित व सुयोग्य विकास होण्यासाठी सध्याचा ६.० मी. रस्ता भू.क्र.२७ (सि.स.नं.८९८१) च्या दक्षिण बाजूस स्थलांतरित करणे आवश्यक आहे व रस्ता दक्षिणेकडे स्थलांतरीत झाल्यास दोन्ही सि.स.नं.एकत्र करून परिसराचा नियोजनबद्द विकास करणे शक्य होईल यानुसार सदर रस्ता स्थलांतरीत करण्यासाठी मान्यता मिळणेबाबत विनती अर्ज केला आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम २१०(१)(ब) नुसार रस्त्याची रेषा विहित करण्याचा अधिकार महानगरपालिका आयुक्त यांना आहे.

यानुसार भू.क्र.२४ व २५ (सि.सं.क्र.८९७६, ८९८३) मध्ये दर्शविलेले ६.०० मी रुंद रस्त्याचे क्षेत्र हे भू.क्र.२७ (सि.सं.क्र.८९८१) मध्ये स्थलांतरीत करण्याबाबत ज्या नागरिकांच्या काही सूचना/हरकती असतील त्यांनी ही सूचना प्रसिध्द होईल त्या तारखेपासून ३० (तीस) दिवसांच्या आत सचिव, धुळे महानगरपालिका कार्यालय, प्रथम मजला यांच्या कार्यालयात लेखी स्वरूपात सादर कराव्यात. विहित कालवधीत प्राप्त झालेल्या सूचनांचा/हरकतींचा योग्य तो विचार करण्यात येईल. ठिकाण- धुळे. दिनांक :- २१/०८/२०२६.

नितीन कापडणीस
आयुक्त
धुळे महानगरपालिका

जा.क्र.धूमपा/रेकॉर्ड/१६२/२०२६-२७

**घर विकणे आहे**
प्लॉट नं. ५ ब, उत्कर्ष कॉलनीसमोर, जिवरकनगर, साक्रीरोड, धुळे १६३७ स्क्वे.फुट जागा व ७५० स्क्वे.फुट बांधकाम योग्य किंमत आल्यास विकणे आहे.
-:संपर्क :-
8698272360

**पाहिजेत**
धुळे जिल्ह्या माझे सोलर कंपनीमध्ये काम करण्याकरीता फिल्ड ऑफिसर, ट्रेनि मॅनेजर मुला/मुलीची/ स्त्री/पुरूषांची त्वरीत आवश्यकता.
वयाची व शिक्षणाची अट नाही पगार- २०,०००/- ते २५०००/-
-: संपर्क :-
7447422022
9209020526

**शेती विक्री**
भाडणे शिवार, स. नं. ५४४/१, साक्री - पिंपळनेर रोड, नागाईकडे जाणारा रस्ता कॉर्नर येथील ९१ आर शेत विकणे आहे. इच्छुकांनी संपर्क साधावा.
-: संपर्क :-
मो. 9850195001
9823189430

**विकणे आहे**
सर्व्हे नंबर ६९/४ प्लॉट नं. २३ जि.प.कॉलनी लागून एल टाईप ४५०० स्केअर फुट स्वामी नारायण मंदिर मागील बाजूस दोनशे फुटावर प्लॉट विकणे आहे.
-: संपर्क :-
9881907408

**पाहिजेत**
हुषार व अनुभवी सेल्समन पाहिजे.
आकर्षक पगार
-: संपर्क :-
साईबाबा रेडिमेड ॲण्ड होजीअरी
गल्ली नं.२, अकबर चौक, धुळे
भेटण्याची वेळ ४ ते ७
9422286958

**TO GIVE ON RENT**
Consulting Rooms For Physiotherapist / Dietetion/ Dermafologist at Station Road
Contact / Whatsapp
7385297921

**गाळा भाड्याने देणे**
शहरातील मध्यवर्ती भागातील साक्री रोड, नेहरु पुतळ्या समोरील १०X१५ चा गाळा भाड्याने देणे आहे.
-:संपर्क :-
7666940969
8551046952

**पाहिजेत**
• नर्स (ANM GNM)
• R.M.O
• रिसेप्शनिस्ट
• B.Sc.ऑप्ट्रोमेट्रीस्ट
संपर्क
यशोदा हॉस्पिटल व नेत्रालय
दत्त मंदीर देवपूर, धुळे
मो. ८३२९२४९३८६

**प्लॉट विकणे आहे**
रामचंद्र नगर कॉंक्रीट रोडटच प्लॉट विकणे आहे. कॉटन मार्केटच्या पुढे, रामचंद्र नगरमध्ये ६० फुटी कॉंक्रीट रोडला लागून ४३०० चौरस फुटाचा प्लॉट विकणे आहे.
-:संपर्क :-
डी आर प्रॉपर्टीज
9422289693

**प्लॉट विकणे**
अग्रवाल नगरमध्ये २००० स्क्वेअर फुटाचा प्लॉट विकणे आहे.
-:संपर्क :-
डी आर प्रॉपर्टीज
9422289693.

**३ बीएचके बंगला भाड्याने देणे**
मालेगांव रोड लगत, महावीर सोसायटी जवळ, तीन बेडरूम, हॉल, डायनिंग, किंचन, स्टोअर रूम फर्निचरसह गार्डन कंपाऊंड पार्किंग सह बंगला भाड्याने देणे आहे.
-:संपर्क :-
डी आर प्रॉपर्टीज
9422289693

**अजळकरनगर रो हाऊस विकणे**
सुरत बायपास जवळ अजळकर नगरमध्ये दोन मजली रोहाऊस घर फर्निचरसह विकणे आहे.
-:संपर्क :-
डी आर प्रॉपर्टीज
9422289693

**पाहिजेत**
१) कॉम्प्युटर ऑपरेटर
२) एक्स-रे टेक्नीशियन
पाटील डायग्नोस्टीक सेंटर
वाडीभोकर रोड, देवपूर, धुळे
(02562) 299500
Whatsapp- 9098444407

**पाहिजेत**
होलसेल मेडिकल दुकानात कामासाठी हेल्पर- २
माल काढण्यासाठी -२
माल पोहचविण्यासाठी -३
होतकरू मुले लावणे आहेत
समक्षभेटा-
-: संपर्क :-
राजा एन्टरप्रायजेस
टॉवर बागे जवळ जे.बी.रोड, धुळे

**प्लॉट विकणे**
3900 sq.ft.
15 mtr DP road front २ रोड कॉर्नर प्लॉट विकणे. अरूण कुमार वैद्य नगर
-: संपर्क :-
7391055331

**पाहिजेत**
रेडिमेड दुकान कामासाठी हुशार, मुले पाहिजेत.
आकर्षक पगार
-: त्वरीत भेटा :-
श्री सत्यनारायण ड्रेसेस
ग. नं. २, जैन मंदिराजवळ, धुळे फो. नं. २३६४८५

**पाहिजेत**
Tally A/C करिता पार्टटाईम लेडीज/जेंटस् पाहिजे.
-: संपर्क :-
दि भारत एजन्सीज
पारोळा रोड, धुळे

**विकणे आहे**
2 BHK Flat विकणे आहे.
मोहाडी रोड, पेट्रोल पम्पाजवळ, धुळे शासकीय डेअरी समोर, समता नगर, धुळे
-:Broker:-
L.G. Property
मो. 9793093955

**पाहिजेत**
हुशार व अनुभवी सेल्समन व हेल्पर पाहिजेत.
-: संपर्क :-
शाह हॅन्डलुम
गल्ली नं. २, नवग्रही
पारोळा रोड, धुळे
मो. 9422792384

**पाहिजेत**
लॉज कामासाठी मुलगा व मावशी लावणे आहे.
-:समक्ष भेटा :-
शांती गित लॉज
पाच कंदिल, आग्रारोड, धुळे

५९ वर्षांपासुन धुळेकरांच्या विश्वासाला पात्र ठरलेले...
Authorised Dealer
Godrej | LG Life's Good | JAPAN PREMIUM
सर्व आधुनिक व लेटेस्ट मॉडेल



0% फायनान्सची सुलभ E.M.I सुविधा उपलब्ध.
BAJAJ FINSERV | HDB FINANCIAL SERVICES
श्री महावीर इलेक्ट्रीक ॲण्ड टी.व्ही.
श्रीराम मंदिराजवळ, फुलवाला चौक, आग्रा रोड, धुळे. फोन: (02562) 229162, 235763

हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक, हेमंत सुधाकर मदाने यांनी हेमंत प्रिंटींग प्रेस, वीर सावरकर मार्ग, धुळे येथे मुद्रित करून आपला महाराष्ट्र, जनशक्ती, वीर सावरकर मार्ग, धुळे-४२४००१ येथे प्रकाशित केले. दुरध्वनी मुख्य कार्यालय, धुळे (०२५६२) २३५३९६, २३८३९६, aplamaha@gmail.com नंदुरबार २२३४४४ aplamahashd@gmail.com शहादा-२५६९३९, मालेगाव-२४३१३३६, नाशिक-२५७५९८९, पुणे-९८२३०४६५२२, आपला महाराष्ट्र-रजि.नं.एम.एच.डी.आय.ए.१७ र.नं.१९२२२/६०